सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग

दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

जा. क्र.ग्रापं/५/कावि/~~ग्राउभाउ~~/२०१६, दि ७ /४/२०१६
३०६५

प्रति,

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)
जिल्हा परिषद सातारा.

विषय :-**ग्राम उदय से भारत उदय अभियान (दि.१४ एप्रिल,२०१६ ते दि.२४ एप्रिल, २०१६) अंतर्गत विविध उपक्रम हाती घेणेबाबत...**

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ४/४/२०१६.

केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने, दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार, सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्राम उदय से भारत उदय अभियान तीन टप्प्यात राबविण्याचे आहे. केंद शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तिसऱ्या टप्प्यामध्ये दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करावयाच्या असून, पूर्वतयारी म्हणून स्वच्छता मोहित हाती घ्यावयाची आहे. याबाबतच्या सविस्तर सूचना संदर्भीय पत्राने गट विकास अधिकारी यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत –

१) सातारा जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत स्वच्छता मोहिम आयोजित करावी.

२) याबाबत खालील यंत्रणेला स्वच्छता मोहिमेत सहभागी करुन घ्यावे.

a. जिल्हास्तरावरील पाणी व स्वच्छता मिशन कक्षाकडील तज्ञ.
b. तालुकास्तरावरील गट संसाधन केंद्रातील गट समन्वयक (BRC), समुह समन्वयक (CRC).
c. पाणी गुणवत्ता सल्लागार व ग्रामलेखा
d. जलसुरक्षक व निर्मल दूत
e. ग्राम पाणी व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, सचिव, सदस्य.

३) प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता मोहिमेचे आयोजन करावयाचे आहे.ज्यामध्ये गावातील रस्ते, गल्ली-बोळे, इ.ची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची स्वच्छता, हातपंप प्लॅटफॉर्मची स्वच्छता, कचरा विल्हेवाटीसाठी कंपोस्ट खड्डे (digging of garbage pits) तयार करणे, लोकांच्यामध्ये स्वच्छताविषयक जागृती करणेसाठी गृहभेटी, सार्वजनिक साफसफाई मोहिम इ.बाबींचा समावेश करण्यात यावा.

४) शाळा, सार्वजनिक संस्था, कार्यालये, गृहभेटी अशा विविध ठिकाणी एकाचवेळी स्वच्छताविषयक वातावरण निर्मिती करणेसाठी ग्रामपंचायत सदस्यांचे ३ ते४ गट तयार करावेत. प्रत्येक गटात महिलांसह सर्व वयोगटांतील लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे.

५) ग्रामसभांना उपस्थिती :- अभियाना कालावधीत ग्रामपंचायत स्तरावर आयोजित केलेल्या ग्रामसभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करण्याबाबत पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील तज्ञ, BRC, CRC यांना सूचना द्याव्यात.

स्वच्छता मोहिमेच्या अनुषंगाने राबविलेल्या उपक्रमांची माहिती व छायाचित्रे SOFT COPY ग्रामपंचायत विभागाकडे वेळोवेळी सादर करावीत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद सातारा.**

प्रत – गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व